International Recognized Double-Blind Peer Reviewed Multidisciplinary Research Journal
Golden Research Thoughts
ISSN 2231-5063 Impact Factor : 3.4052 (UIF)
Volume - 4 | Issue - 11 | May - 2015 Available online at www.isrj.org

भारतातील अन्न सुरक्षितता

गोंड सुरेश वसंतराव
अर्थशास्त्र विभागप्रमुख , शरदचंद्र महाविद्यालय, शिराढोण , ता. कळंब जि. उस्मानाबाद.

सारांश :

लोकसंख्येच्या बाबतीत आजही भारताचा जगात दूसरा क्रमांक लागतो. देशाच्या वाढत्या लोकसंख्येबरोबरच अन्नधान्याची गरजही वाढत आहे. भारतात हरीतक्रांतीपासून अन्नधान्याच्या पुरवठ्यात मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. हरीतक्रांतीपूर्वी देशातील अन्नधान्याची गरज भागविण्यासाठी देशात उत्पादित होणारे अन्नधान्य अनुरे पडत होते. त्यामुळे देशाची अन्नधान्याची गरज भागविण्यसाठी विदेशातून अन्नधान्याची आयात करावी लागत होती. मात्र १९६६-६७ नंतर म्हणजेच हरीतक्रांती पासून देशात भरपूर उत्पादन देणाऱ्या वाणांचा उत्पादनासाठी वापर करण्यात येऊ लागला. त्यासोबतच किड नियंत्रनासाठी किटकनाशकांच्या वापरातही मोठ्या प्रमाणात वाढ झाली. जास्तीचे उत्पादन मिळावे यासाठी रासायनिक खते, द्रव्ये यांच्याही वापरात वाढ झाली. परिणामी आपल्या देशात अन्नधन्य उत्पादनात अमुलाग्र वाढ झाली. या वाढीमुळे आपली अन्नधान्याची गरज पूर्ण झाली.

प्रस्तावना :

[]षी उत्पदनात वाढ झाली हे जरी खरे असले तरी या उत्पादनाचे जतन व साठवण करणेही तीतकेच महत्वाचे आहे. कारण भारतीय कृषी ही प्रामुख्याने पावसावर अधारीत आहे. म्हणून हे कृषी उत्पादन सूरक्षीतरीत्या साठवून ठेवणेही तीतकेच महत्वाचे आहे. त्याचबरोबर जतन करुण ठेवलेले अन्नधान्य गरजू व्यक्तीपर्यंत पोहचणे आवश्यक आहे. म्हणून जे अतीरिक्त उत्पादन आहे हे उत्पादन साठवण्यासाठी साठवन सुविधांची उपलब्दताही तीतकीच महत्वाची आहे.

- **संशोधनाची उद्दिष्ट्ये:-**
  १) भारतातील अन्नसुरक्षेचा अभ्यास करणे.
  २) भारतातील कुपोषनाचे प्रमाण अभ्यासने.
  ३) भारतातील वितरण व्यवस्थेचा अभ्यास करणे.
- **संशोधनाची गृहित[] :-**
  १) ५ वर्ष वयोगटाखालील बालकांमध्ये कुपोषणाचे प्रमाण अधिक आहे.
  २) भारतातील वितरण व्यवस्था अपुरी आहे.
- **संशोधन पध्दती:-**

सदरील संशोधन लेख लिहिण्यासाठी द्वितीय सामग्रीचा वापर करण्यात आला असून, त्यासाठी विविध संदर्भग्रंथ, मासिके, पाक्षिके, साप्ताहिके, वर्तमानपत्रे, इंटरनेट, इत्यादिंचा आधार घेण्यात आलेला आहे.

- **अन्न सुर[]ची संकल्पना :-**

अन्न सुरक्षेच्या व्याख्या अनेकांनी मांडण्याचा प्रयत्न केला आहे. काही व्याख्या पुढीलप्रमाणे :

१) जागतिक विकास अहवाल (१९८६):-

लोकांना सक्रिय राहण्यासाठी व आरोग्यदायी जीवन जगण्यासाठी नेहमी पुरेशा अन्नपुरवठ्याची सोय उपलब्द []रु[] देणे म्हणजे अन्न सुरक्षीतता होय.

२) स्टाझ् (१९९०):-

लोकांना वेळेवर विश्वसनीयरीत्या, पोषक आहार दीर्घकालीन स्वरुपात उपलब्द होण्याची, खात्री पटण्याची प्रक्रिया व व्यवस्था म्हणजे अन्न सुरक्षा होय.

३) अन्न आणि कृषी संघट-न (FAO १९८३):-

सर्व लोकांना सदैव अन्नाची भौतिक आणि आर्थिक उपलब्धता असण्याच्या स्थितीला अन्न सुरक्षितता असे म्हणतात.

थोडक्यात वरील व्याख्यांवरुन असे दिसून येते की, देशातील एकूण लोकसंख्येला आवश्यक असणाऱ्या अन्नधान्याची उपलब्दता होणे आवश्यक आहे. त्याबरोबरच उपलब्द अन्नधान्याच्या खरेदिसाठी लोकांकडे अन्नधान्याची खरेदिशक्ति असणे

आवश्यक आहे. अन्न धान्य पुरवठ्यात देश जरी स्वयंपूर्ण असला तरी दिर्घकाळात लोकांना पौष्टिक, प्रथिनयुक्त व विश्वसनिय असा अन्नपुरवठा होणे अपेक्षित आहे.

➢ भारतातील अन्नसुरक्षा :-

अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपर्णता राखने हे नियोजनकाराचे महत्वाचे उद्दिष्ट असते. देशातील लोकांना चांगल्या गुणवत्तेचे व योग्य मात्रेत अन्नधान्याचा पुरवठा करण्यासाठी प्रथमत: आपला देश अन्नधान्य उत्पादनात स्वावलंबी असला पाहिजे. भारताने आपल्या देशाला अन्नधान्य उत्पादनात स्वावलंबी बनविण्यासाठी स्वातंत्र्यप्राप्तीपासूनच अनेक प्रकारच्या योजना सुरु केल्या आहेत.

एखाद्या देशाकडे अन्नधान्याचा साठा मुबलक असेल तर तो देश इतर देशाबाबत ते एक शस्त्र म्हणून वापरतो. भारतात हरीतक्रांती होण्याच्या अगोदर वाढत्या लोकसंख्येबरोबर अन्नधान्याच्या पुरवठ्यात वाढ होत नव्हती. अन्नधान्या उत्पादन वाढीच्या दरापेक्षा लोकसं□या वाढीचा दर जास्त होता. साहजिकच अन्नधान्याची गरज भागविण्यासाठी आपनाला इतर देशांवर अवलंबून राहावे लागत होते. सन १९६५ आणि १९६६ अशा सलग दोन वर्षी भारतात दुष्काळ पडला होता. तेव्हा अमेरि□ा सरकारने पी. एल. ४८० कलमानुसार अन्नधान्याच्या आयातीवर अनेक बंधने लादली होती. तेव्हा या दुष्काळजन्य परस्थितीत लोकांची अन्नधान्य पुरवठ्याची गरज भागविण्यासाठी सरकारला तारेवरची कसरत करावी ला□ली.

भारताच्या पंतप्रधान इंदिरा गांधी झाल्यापासून देशाला अन्नधान्याच्या उपलब्दतेत स्वयंपूर्णता आनन्यासाठी प्रयत्न केले गेले त्यासाठी रासायनिक खते, बी-बीयाने, जलसिंचनाच्या सोयींमध्ये वाढ करण्यावर भर देण्यात आला. याचीच फलसृती म्हणून देशात सन १९६६ ते १९६९ या काळात देशातील अन्नधान्य उत्पादनात मोठ्या प्रमाणात वाढ होऊन देश अन्नधान्य उत्पादनात स्वावलंबी बनला व याच काळात देशात अन्नधान्याची आयात बंद होऊन काही वाणांच्या निर्यातीला सुरुवात झाली अन्नधान्य उत्पादनात देश स्वावलंबी बनला.

अन्नधान्य उत्पादनात आपला देश जरी स्वयंपूर्ण झाला असला तरी दारिद्र्यरेषेखालील सर्व लोकांना दारिद्र्यरेषेच्या वर आनण्यात सरकारला फारसे यश आले नाही. २००१ च्या जनगणनेनुसार एकूण लोकसंख्येपैकी जवळपास ३६ कोटी लोक दारिद्र्यारेषेखाली जीवन जगत होते. या लोकांना अन्नधान्याचा पूरवठा करण्याची जबाबदारी सरकारची असल्यामुळे सरकारने सन २००९ मध्ये 'राष्ट्रीय अन्नसुरक्षा कायदा (Natinol Food Sequirity Act)' करण्याची घोषना केली या कायद्यानुसार देशातील दारिद्र्य रेषेखलील प्रत्येक कुटूंब दर महिण्याला ३५ किलो अन्नधान्य ३ रु प्रती किलो दराने देण्याचे ठरविण्यात आले.

सन १९५०-५१ ते आजतागायतचा अन्नधुन्य उत्पादनाचा विचार करता १९७१ पर्यंत अन्नधान्याची आयात करावी लागली. त्यानंतर मात्र अन्नधान्याच्या आयातीची गरज राहीली नाही. १९०-५१ मध्ये एकूण अन्नधान्य उत्पादनात ८४ टक्के तृनधान्याचे उत्पादन होते. यामध्ये वाढ होऊन २००९-१० मध्ये हे उत्पादन ९४ टक्क्यांपर्यंत वाढले याच काळात डाळींच्या उत्पादनात मात्र १६ टक्क्यांवरुन ०६ टक्क्यांपर्यंत घट झाली

➢ अन्नसुर□ा व □पोष□ा:-

सद्या स्थितीत भारत अन्नधान्याच्या बाबतीत काही प्रमाणात स्वयंपूर्ण जरी झाला असला तरी देशात कुपोषणाचे प्रमाण खुप आहे. अन्नसुरक्षा आणि कुपोषन याचा फार जवळचा संबंध आहे. कारण देशात केवळ अन्नधान्य मुबलकप्रमाणात उपलब्द

असून उपयोग नाही तर ते गरजू व्यक्तीपर्यंत वेळेवर व सुस्थितीत पोहचनेही तीतकेच महत्वाचे आहे. जगातील एकूण □पोषीतांपैकी जवळपास २७ टक्के कुपोषण भारतात आहे. जागतिक भूक निर्दोशांकाच्या ११९ देशांच्या यादीत भारताचा ९४ वा क्रमांक आहे. ही बाब चींतनीय स्वरुपाची आहे. कारण एकीकडे देश विकासाच्या दिशेने वाटचाल करीत आहे. अन्नधान्य उत्पादनात स्वयंपूर्ण बनत आहे. मग असे असतांनाही देशात कुपोषनाचे प्रमाण एवढे का? असा प्रश्न निर्माण होतो. देशातील कुपोषणाचे प्रमाण कमी करावयाचे असेल तर अन्नसुरक्षा योजना प्रभावीपणे कार्यान्वीत होणे आवष्यक आहे. उत्पादीत अन्नधन्य योग्य वितरण व्यवस्थेमार्फत गरजूंपर्यंत रास्त किंमतीला मिळाले तर देशातील कुपोषन नक्कीच कमी होईल.

□ालील तक्त्याच्या आधारे देशातील रात्यनिहाय कुपोषणाचे प्रमाण दर्शवलेले आहे.

देशातील राज्यनिहाय वयोगटानुसार कुपोषणाचे प्रमाण

अ.क्र.	राज्य	वयोगट	
		०५ वर्षा□ालील	०६ ते०९ वर्ष
१	२	३	४
०१	आंद्रप्रदेश	६३.७	३६.५
२	आरुणाचल प्रदेश	७७.६	३६.९
३	आसाम	५९.६	४०.४
४	बीहार	५७.३	५८.४
५	छत्तीसगड	५४.५	५२.१
६	दिल्ली	५९.८	२३.१
७	□ावा	६९.८	२९.३
८	□ुजरात	५७.१	४७.४
९	हरीया□ा	४४.९	४१.९
१०	हिमाचलप्रदेश	६६.०	३६.२
११	जम्मु आणि कश्मीर	५८.०	२९.४
१२	झारखंड	६५.३	५९.२
१३	□र्नाटक	७२.५	४१.१
१४	□रळ	९३.६	२८.८
१५	महाराष्ट्र	४७.८	३९.७
१६	मध्यप्रदेश	५१.९	६०.३
१७	म□ीपूर	७८.१	२३.८
१८	मेघालय	७६.३	४६.३
१९	मिझोराम	८४.६	२१.६
२०	नागालँड	७१.०	२९.७
२१	ओरिसा	६७.५	४४.०
२२	पंजाब	५०.०	२७.०
२३	राजस्थान	३८.७	४४.२
२४	सिक्कीम	८९.९	२२.६
२५	तामिळनाडू	७७.९	३३.२

२६	त्रिपूरा	५९.८	३९.०
२७	उत्तरप्रदेश	४५.५	४७.३
२८	उत्तरांचल	५१.६	३८.०
२९	पश्चिम बंगाल	५५.९	४३.५
३०	**भारत**	**५५.५**	**४५.९**

*(**Source :-** ११ th Five Year Plan (२००७-२०१२) Volume II, Planning Commission of India, Social Sector १३)*

राज्यनिहाय वयोगटानुसार कुपोषनाचा विचार करता असे दिसून येते की, देशातील ५ वर्षाखालील वयोगटातील बालकांचे कुपोषनाचे प्रमाण ६ ते ९ वयोगटातील कुपोषनापेक्षा जास्त आहे. ५ वर्षाखालील वयोगटात राज्यनिहाय विचार करता कुपोषनाचे सर्वाधिकप्रमाण केरळ (९३.६ टक्के) राज्यात होते, तर सर्वात कमी प्रमाण राजस्थान (३८.७ टक्के) राज्यात होते. ६ ते ९ वयोगटात कुपोषनाचे सर्वाधिक प्रमाण मध्येप्रदेशात (६०.३ टक्के) होते, तर सर्वात कमी प्रमाण मेघालय (२१.६ टक्के) राज्यात होते. कुपोषनाची ही स्थिती पाहूनच भारत सरकरने २ ते १४ वर्षे वयोगटातील शाळकरी मुलांसाठी मध्यान्ह भोजन योजना सुरु केली. नंतर या योजनेचे नाव बदलून 'प्रथमिक शिक्षणासाठी पोषण आहार' असे ठेवण्यात आले. सन २००३-०४ पर्यंत या मार्यक्रमाचा लाभ १०.६ कोटी बालकांना झाला. तसेच १९७० पासून विशेष पोषण आहार कार्यक्रम सुरु करण्यात आला. याअंतर्गत गर्भवती व प्रसूत महिलांना ५०० किलो कॅलरीज आणि २५ किलो प्रोटीन्स मिळतील इतका आहार पुरविला जातो. शासनाने राबवलेल्या या योजनांमुळे देशातील कुपोषनाचे प्रमान आटोक्यात राहण्यास मदत झालेली आहे.

➢ भारतातील सार्वजनिक वितरण व्यवस्था:-

सार्वजनिक वितरण व्यवस्था हि देशातील लो□ांची अन्नसुरक्षितता व सामाजिक कल्याणात सुधारणा करण्याचे एक प्रमुख साधन आहे. देशात उतादित होणारे अन्नधान्य गरजू लोकांपर्यंत पोहचविण्यासाठी सरकारणे सार्वजनिक वितरण व्यवस्था सुरु □ली. □मी उत्पन्न गटातील लोकांच्या हिताचे रक्षण करणे ही या योजनेचे प्रमुख उद्दिष्ट आहे. देशातील दारिद्र्य रेषेखालील कुटूंबांना जीवनावश्यक वस्तू माफक किंमतीने उपलब्द करुन देण्याचे सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे मुख्य उद्दिष्ट असते.

भारतातील सार्वजणिक वितरण व्यवस्था ही केंद्र व राज्य शासन संयुक्त जबाबदारीने चालविते केंद्र शासनाकडे धान्य खरेदी करणे, खरेदी केलेल्या धान्याची साठवण, राज्यांना एकठोक अन्नधान्यांचे वाटप, इ. बाबींची जबाबदारी केंद्र शासनाची असते, तर राज्य शासनाकडे अन्नधान्याचे स्वस्त धान्य दुकानांमार्फत गरजू ग्राहकांमार्फत वितरण करणे राज्यातील दारिद्र्य रेषेखालील कुटूंबाची नोंदणी करणे, शिधा पत्रिकांचे वाटप करणे, शिधा वाटप दुकानांचे पर्यवेक्षण व वार्षिक नियंत्रण करणे, इत्यादी बाबींचा समावेश राज्य सरकारकडे होतो.

राज्यातील गरीब जनतेला अन्नधान्याचा पुरवठा करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने सार्वजनिक वितरण व्यवस्था सुरु केली. या योजनेत १९९२ मध्ये काही प्रमाणात बदल करुण गहू, तांदूळ, साखर, डाळी, रॉकेल या प्रमुख वस्तूंबरोबरच चहा, साबण, आयोडीनयुक्त मीठ, इ. जीवनावश्यक वस्तू पूरवण्यास सुरुवात केली. पुढे या योजनेत ०१ जून १९९७ पासून द्विस्तरीय किंमत पध्दतीचा वापर करुण दारिद्र्य रेषेखालील लोकांसाठी वेगळे दर व इतर लोकांसाठी वेगळे दर वापर□यास सुरुवात झ ाली. यानंतर ०१ मे १९९९ पासून तर त्रिस्तरीय शिधा पुरवठा पत्रिका योजना सुरु केली गेली. केवळ गरजू कुटूंबांनाच अन्नधान्य मिळावे हा या योजनेच प्रमुख उद्देश होता. या योजनेमध्ये कुटूंबाच्या वार्षिक उत्पन्नानूसार तीन गट करण्यात आले. ज्या कुटूंबाचे वार्षिक उत्पन्न १५,०००रु आहे. अशा कुटूंबांना परवळ्या रंगाची शिधा पत्रिका, तर ज्या कुटूंबाचे वार्षिक उत्पन्न १,००,०००रु

पर्यंत आहे त्यांना केशरी रंगाची शिधा पत्रिका देण्यात येऊ लागली. देशातील गरजू कुटूंबांना कमी किंमतीने अन्नधान्याचा पुरवठा करण्यासाठी सरकारणे डिसेंबर २००० मध्ये अंत्योदय अन्न योजना सुरु केली. या योजनेअंतर्गत २.५ कोटी गरीब गरजू कुटूंबांना ३५ किलो गहू २ रुपये दराने तर तांदूळ ३ रु. प्रती किलो दराने देण्यात आले.

या वितरण व्यवस्थेमार्फत पूरविण्यात येणारे अन्नधान्य हे एक तर विदेशातून आयात केलेले किंवा देशांतर्गत उत्पादनातून उत्पादित झालेले अन्नधान्य असते. पूर्वी भारत अन्नधान्य उत्पादनात सक्षम नव्हता तेव्हा गरजेनुसार अन्नधान्याची आयात केली जात होती. अलिकडील काळात आपल्या देशात अन्नधान्याचे उत्पादन मोठ्या प्रमाणात होत असल्याने आयातीची गरज राहिलेली नाही.

➢ सारांशः-

भारत आज अन्नधान्य उत्पादनात स्वयंपूर्ण झालेला आहे. देशात शेती ही आधूनिक पध्दतिने केली जात असल्यामुळे देशाच्या निर्यातीत शेतमालाचा वाटा मोलाचा आहे. मात्र देशातील अन्नसुरक्षा योजना काही प्रमाणात अपूरी असल्याचे दिसून येते. त्यामुळे उत्पादीत अन्नधान्य गरजू व्यक्तिंपर्यंत पोहचण्यास अडथळे निर्माण होत आहेत. याचा पारणाम म्हणून देशात पोषणाचे प्रमाणही वाढत आहे. हे कमी करण्यासाठी देशातील वितरण व्यवस्था आणखीन बळकट करणे आवष्यक आहे. वितरण व्यवस्था अधिक कार्यक्षमपणे राबवने आवष्यक आहे.

➢ संदर्भः-

१) भारतीय अर्थव्यवस्था - प्रा. रायखेलकर / डॉ. दामजी.

२) आर्थिक विकास व नियोजन आणि सांख्यिकीय पध्दती - वसुधा पुरोहित.

३) षी विकासाचे अर्थशास्त्र - डॉ. टी. व्ही. पोवळे / डॉ. एस. आर. टकले / डॉ. विलास खंदारे.

४) आर्थिक विकास : एक चिंतन - संपाद - डॉ. शेख फारुक नजीर / श्रीमती उस्मानी तय्यबा हिशाम.

५) आर्थिक सर्वेक्षण (२०००-१०) - दहावी पंचवार्षिक योजना, नवी मुंबई.

६) महाराष्ट्र शासन (२०१०-११) महाराष्ट्राची आर्थिक पहाणी, मुंबई.

७) Raravikar Ashuitosh (2001), Food Security in India.

८) 11th Five Year Plan (2007-12) Volume Ii, Planning Commission of India, Social Sector 13

९) NSS, 61 st Round, 2004-05, 11th Five Year Plan (2007-12)

१०) World Development Report, 1986.